


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# “पारधी” या कादंबरीतील फासेपारधी समाज जीवनदर्शन..

**प्रा.सूर्य पुरुषोत्तम प्र.**
संशोधक विद्यार्थी,
मु.पो.काटा.ता.जि.वाशीम -४४४५०५

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजव्यवस्था अनेक जाती-जमातींनी बनलेली आहे. या जातीजमातींची उतरंड इथल्या समाजव्यवस्थेत दिसते. त्यातच ही समाजव्यवस्था विषम आहे. अशा समाजातील कामगार, मजूर, शेतकरी, या गरीबघटकांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. त्यांच्यावर केले जाणारे अन्याय-अत्याचार याविषयी तसेच प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध मनातील संताप नवपिढीतील तरुणवर्गाने लेखणीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. समताधिष्ठित आणि मानवतावादी समाज निर्माण व्हावा, अशी आस त्यांना वाटते.त्यामुळे स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीमध्ये फडके-खांडेकरांच्या कादंबरीपेक्षा वेगळ्या रूपाची कादंबरी जन्माला आलेली दिसून येते.कादंबरीच्या लेखनामागच्या प्रेरणाही बदलत गेल्या. त्यातून मराठी साहित्याला अपरिचित विश्वाचे दर्शन घडू लागले. डॉ. शंकरराव खरात यांनी मराठी साहित्याच्या परिघावर अस्पृश्य समाजाच्या व्यथावेदना मांडून गावकुसाबाहेरील जीवनमरणाची वास्तविकता साहित्यातून प्रकर्षाने मांडली आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत “ पारधी “ ही जमात उपेक्षित घटक ठरली आहे. अन्न-वस्त्र-निवारा ह्या मानवाच्या प्रमुख जीवन गरजा त्यांना पूर्णपणे मिळू शकल्या नाहीत. एका बाजूला माणसाने विज्ञानाच्या प्रगतीने आकाशाला गवसणी घातली आहे तर दुसऱ्या बाजूला फासेपारधी समाज अजूनही आदीम जीवन जगत आहे. फासेपारध्यांना भटके जीवन जगावे लागत आहे.कुठेतरी गावाच्या बाहेरील डोंगरावर पाल ठोकून राहावे लागते. समाजाला सतत पोलिसांचा धाक, सततच्या भटक्या जीवनाचा कंटाळा, नैराश्यवृत्ती,उपेक्षित दु:खी जीवन अशी जीवनाविषयी कमालीची उदासीनता पाहावयास मिळते. सामाजिक विषमता अशी पारधी समाजात विषम परिस्थिती दिसून येते. संघर्षमय जीवनप्रवास, मनात बाळगलेली प्रबोधनाची आस परंतु वास्तव समाजव्यवस्थेशी जुळवून घेतांना पराकोटीचा संघर्ष वाट्याला आलेला दिसतो.समाजात माणूस म्हणून आजही त्यांच्याकडे पाहिले जात नाही. ही फासेपारधी समाजातील माणसाची व्यथा डॉ. शंकरराव खरात यांनी “ पारधी “ या कादंबरीतूनही चित्रित केली आहे. या कादंबरीमध्ये फासेपारधी समाजाचे चित्रण आलेले आहे. भटक्या जातीत जन्माला आल्यामुळे सदैव दु:ख,अवहेलना सोसणाऱ्या पण माणसात येवू पाहणाऱ्या ‘ चित्र्या ‘ या पारधी तरुणाची कहाणी सांगितली आहे. चित्र्या हा २५ वर्षाचा पारधी समाजातील तरुण स्वाभिमानाने आपले जीवन जगत असतो पण समाज व पोलीस या तरुणाला गुन्हेगार,चोर म्हणून वागवित असतात.

त्याच्यावर चोरीचा खोटा आक्षेप घेतला जातो. कोर्टातून तो निर्दोष सुटल्यावर नोकरी करतो. स्वतंत्रपणे स्वाभिमानी आपण जीवन जगावे असे त्याला वाटत असते पण समाज त्याला तसे जगू देत नाही. त्यामुळे प्रचलित समाजव्यवस्थेविरुध्द त्याची बंडाची भाषा, फासेपारधी यांचे जीवनमान, स्त्रीजीवन अवहेलना,दारिद्र्य,दु:ख,संघर्ष या कादंबरीतून प्रतित झालेली आहे.

**"पारधी " या कादंबरीतून प्रतित झालेले फासेपारधी समाज जीवनदर्शन :-**

फासेपारध्यांना सतत भटके जीवन जगावे लागते. गावाच्या बाहेरील डोंगरावर पाल ठोकून राहावे लागते फासेपारध्यांच्या पालाचे वर्णन करतांना कादंबरीकार डॉ.शंकरराव खरात म्हणतात, " डोंगराच्या कुशीतली फासेपारध्यांची पालं म्हणजे झाडाला चिकटलेल्या सरड्यागत डोंगराच्या उतरणीला चिकटलेली, दोनच कळकाच्या मढीवर उभी असलेली, आजूबाजूला त्यांना दोरीच्या ओढणीने तणावे दिलेले, तीच पोत्या-पटकारांची, पातळशा वाकड-गोधड्याची पालं उनवाचात, थंडी पावसात उभी राहणारी. काही पालांना मावळतीच्या बाजूने येणाऱ्या भिरभिर वाऱ्याच्या तोंडाला गवताच्या विणलेल्या आडव्या चट्ट्या लावलेल्या पण तीनही बाजूंना खालून उघडीच असणारी पालं,खाली डोंगराची दगड टोळ्याची धरणी अन् वर पालाच्या पटकर तरटाचा आडोसा, त्याला पडलेल्या भोका-भोसक्यातून डोकवणारं वरचं आभाळ.... पारध्यांच्या पालातला त्यांचा संसार फाटका-तुटका पारध्यागतचं उघडानागडा "१ फासेपारधी यांच्या उपेक्षित-दुःखी जीवन यांचे चित्रण करतांना कादंबरीकार म्हणतात , " फासेपारध्यांना जीवन म्हणजे काय ? याचा त्यांना पत्ताच नसतो ते जन्माला येतात म्हणून कसेतरी जगतात. अगदी रानच्या रानजनावरागत त्यांचं जीवनच वाळल्या पाल्या-पाचोळ्यागत असंच कुठंतरी भिरभिरत, भरकटत असतं.पारधी हा माणूस असून त्याला माणूस म्हणून मानले जात नाही. जंगलातले पशुपक्षी म्हणावं तर ती माणसासारखी माणसं दिसतात. असे त्यांच्या उभ्या जीवनाचं कोड आहे ."२

या कादंबरीतील चित्र्या हा पारधी समाजातील एक नायक आहे.तो एका गावात राहायला येतो तेव्हा काही दिवसात पोलीस गावाबाहेरच्या त्यांच्या पालीवर लोकांच्या तक्रारीवरून धाड घालतात. निरपराध असतांना

पोलीस चित्र्याला  पकडून नेतात तेव्हा त्याच्या आईच्या विनंतीवरून शंभुराव वकील त्याच्या सुटकेसाठी प्रयत्न करतात. चित्र्यावर कोर्टात खटला सुरू असता वकील शंभुराव न्यायाधीशांना सांगताना, “ साहेब आपल्या समाजाने त्यांना माणूस म्हणून मानलचं नाही. त्यांना आपल्या समाजाने पक्षागत मानलं. पारधी हा माणूस आहे. त्याला घरचा निवारा लागतो. त्याला स्वतःचे गाव पाहिजे. जगायला जमीन पाहिजे. त्याचा कोणी कधी विचारच केला नाही.”३ कोर्टात न्यायाधीश चित्र्याची चौकशी करतात तेव्हा आम्हांला गाव नाही,घर नाही अशी कैफियत चित्र्या न्यायाधीशांसमोर स्पष्ट मांडतो.त्यावेळी शंभुराजे वकील न्यायाधीश साहेबांना म्हणतात , “ साहेब,याचं जीवनचं असं वा-यावर, उघड्यावर आहे.ते धक्का देणारं आहे. हे समाजरचनेतील विषमतेचं भयानक चित्र आहे. “४ या प्रसंगातून भारतीय समाजव्यवस्थेतील विषमतेची वास्तवचित्र कादंबरीकार मांडतात.फासेपारधी समाजातील माणसांनाही चांगले जीवन जगायची इच्छा असते पण फासेपारधी म्हणून त्यांना कोणी गावात राहू देत नाही कामधंदाही देत नाही. कोर्टासमोर चित्र्या आपल्या मनातील निवेदन करतांना म्हणतो की,तो पारधी समाजातील असला तरी त्याला माणूस व्हायचे आहे. म्हणून तो शंभूराव वकीलाला म्हणतो, “ वकीलसाब मी आता भटका राहणार नाही. मला आता घर पाहिजे. गाव पाहिजे. नोकरी-काम पाहिजे, नायतर मला सरकारी जमीन मिळून दे. मी ते मिळवून खाईन .”५ म्हणून या कादंबरीचा  नायक चित्र्या मनातील उद्वेग व्यक्त करतांना म्हणतो, “ हे जर झाले नाही तर जगण्यासाठी आम्हांला यापुढे हत्यार काढावा लागेल.”६ पारध्यांचे जीवनमान अस्थिर असते. गाववाड्यातील लोक फासेपारध्यांना विनाकारण त्रास देतात.कादंबरीकार पारध्यांच्या अशा अस्थिर जीवनाविषयी सांगताना म्हणतात, “ पण त्यांना एका ठिकाणी, एका गावी कोणी राहू देत नव्हतं. बरेच दिवस पालं एका ठिकाणी पडल्याचं पाहून आजूबाजूचे लोक त्यांच्याविरुद्ध तक्रारी करीत होते. उगीचच बोंब मारीत होते. दोन्ही हातानं वाजवतं होते. पोलीस खात्यात त्यांच्याविरुद्ध तक्रारी अर्ज बॉबलत होते. त्यांच्याविरुद्ध चोरीचे आळ होते. त्यात पोलिसांची अवलाद त्यांचाही पारध्यावर डोळाच ! पारध्यांना त्यामुळे नाईलाजाने आपली पालं एक गाव सोडून दुसऱ्या गावाला नेणं भाग पडतं होतं.”७ या कादंबरीतील शंभुराव वकील

चित्र्याच्या कोर्टातील न्यायहक्काच्या विनवणीवरुन उपेक्षित पारधी समाजासाठी काम करण्याचे ठरवतात.चित्र्याला शक्य तेवढे त्यांच्याकडून सहकार्य करतात.चित्र्याला एसटी डेपोमध्ये कुलीची नोकरी मिळवून देतात.नोकरीच्या ठिकाणी चित्र्या हा पारधी समाजातील तरूण आहे,असे माहित झाल्यावर त्याच्याकडे सर्वच संशयाने पाहतात. हा फासेपारधी समाजातील माणूस नोकरीला आला आहे म्हणजेच चोरीसाठीच आला आहे,असे सगळ्यांना वाटते.त्यामुळे प्रस्थापित समाजाच्या फासेपारधी समाजाकडे बघण्याच्या संशयीवृत्तीबद्दल संताप व्यक्त करतांना चित्र्या चिडून म्हणतो, “ साल्यांनो आमी फासेपारधी काय तुम्हांला चोरच दिसतो ? आमच्यातला माणूस तुम्हाला दिसत नाही.आमच्या कपाळावर काय शिक्का मारलाय काय.? “८ चित्र्याला स्थिर जीवन लाभावे म्हणून शंभुराव वकील गावात एका वस्तीमध्ये नोकरी लावून देतात तसेच भाड्याचे घर मिळवून देतात पण तिथेही त्याचे पारधी समाजातील असणे आड येते.नळावर पाणी भरणे, सार्वजनिक शौचालयाचा वापर करणे याबाबतीत गावातील लोक नवराबायको दोघांनाही त्रास देतात म्हणून या कादंबरीचा नायक चित्र्या पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करतो.तेव्हा हवालदार “ अरं सावल्या, सगळ्या दुनियेच्या

त्याप्रमाणेच या कादंबरीतील खारी ही तुमच्यावर फिर्याद येतात अन् तू कुणावर ही फिर्याद देतोस “९ एक पारधी जमातीतील असल्यामुळे जागोजागी होणारा अन्याय असह्य झाल्यामुळे चित्र्या हवालदारालास्वाभिमानाने म्हणतो, “ ती तुझी दुनिया माझ्यावर अन्याय करायला लागल्यावर मी तिच्याविरुध्द फिर्याद करणारं “१० मुख्य स्त्रीपात्र आहे. तीही पारधी समाजातील आहे. भिक मागताना शंभूराव वकीलाच्या पत्नीशी तिची ओळख होते. मग ती त्यांच्या घरातील भांडी धुण्याचे काम करते. तिथे तिची चित्र्याशी ओळख होते.नंतर शंभुराव वकील खारी व चित्र्या यांचे लग्न लावून देतात. खारी जीवन परिवर्तनाच्या वाटेवर चित्राला पूर्णपणे साथ देते. शंभूराव वकिलाची बायको शकुबाई खारीला आपल्या घरात काम देते. खारी त्यांच्या घरातील काम प्रामाणिकपणे करत असते खारी ही पारधी समाजातील आहे हे शेजारच्या बंगल्यातील लोकांना समजल्यावर ते खारीवर चोरीचा आळ आणून तिच्या तपासासाठी तिच्या

पालीवर जातात. पालीत असलेल्या तिच्या भेटीची वकिलांसमोर झाडाझडती घेतली जाते तेव्हा “ त्या पेटीतून रानपक्ष्यांची पिसे बाहेर पडली. त्यात सश्याची अन हरणांची काटकीतुटकी कातडी होती. सायाळीचे काटेपण होते. त्यात लाकडी खुंट्या व दोऱ्यापण होत्या. त्यात हरणांची शिंगे होती.”११ खारी ही मागासवर्गीय समाजातील स्त्री असूनही तिचे वागणे-बोलणे एका स्वाभिमानी धडपडणाऱ्या स्त्रीचे वाटते. फासेपारध्यांच्या जीवनात दारिद्र्य तर आहेच पण समाज त्यांच्याकडे माणूस म्हणून पाहत नाही ही त्यांची खरी व्यथा खारीच्या बोलण्यातूनही व्यक्त होते ती म्हणते, “ त्या देवानं आमाला वाईट जलम दिला बघा ! जन्माला यावं तर फासेपारधी म्हणून कवा येऊ नये बघा.”१२

“ पारधी “ या कादंबरीमध्ये पारधी जमातीच्या संस्कृतीचे चित्रण करतांना कादंबरीकार पारधी संस्कृतीचे जीवनदर्शन घडविण्यासाठी त्यांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य, अन्याय आणि अत्याचार प्रकर्षाने मांडतात. समाजाची जीवनपध्दती, रुढी-परंपरा, चालीरीती भिन्न आहेत.भटकी जमात असल्यामुळे त्यांच्या जीवनात सुखदुःखे आहेत.त्यांना या उपेक्षित जीवनातून बाहेर पडून स्वच्छंदी जीवन जगण्याची आवड असल्याचे दिसते.माणुसकी जपणारे जीवन जगायचे आहे पण उच्चभ्रू समाज ती संधी देत नाही त्यामुळे या समाजव्यवस्थेत माणूसकीबदलची खंत व्यक्त करतांना चित्र्या म्हणतो ,” मला तुझ्या माणसांत राहायचं नाय.तुझ्या माणसांत माणूसकीच नाय.ती जनावरागत मायेत.या माझ्या डोंगरातला इषारी साप पण माणसागत वागतो.आमाला ढका लावत नाय !पण तुझी माणसं मात्र सापागत धरतात.”१३

कादंबरीकार डॉ.शंकरराव खरात यांच्या “ पारधी “ या कादंबरीतून पारधी समाजजीवन आणि वाट्याला आलेला उपेक्षित जीवन संघर्ष यांचे चित्रण कादंबरीतील व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून अधोरेखित होते.

**निरीक्षणे** :-

१) “ पारधी “ या कादंबरीतून भटक्या-विमुक्त जमातीतील आर्थिक मागासलेपण आणि सामाजिकदृष्ट्या शोषित जमातीच्या जीवनाचे दर्शन घडते.

२) भटक्या-विमुक्त जमातीतील तरुणांमधील नवपरिवर्तनाची जाणीव या कादंबरीतून अधोरेखित झाली आहे.

३) पारधी समाजाचे संघर्षमय जीवनचित्रण या कादंबरीतून प्रतित झालेले आहे.

४) माणसाचे माणूसपण नाकारणा-या प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकलेला आहे.

५) कादंबरीकाराने " चित्र्या " या मुख्य व्यक्तिरेखेतून माणूस म्हणून जगण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या पारधी समाजातील अनेक तरुणांच्या जीवन संघर्षावर लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

६) पारधी समाजातील स्त्री जीवन आणि त्यांचा जीवन संघर्ष " खारी " या स्त्री व्यक्तिरेखेतून कादंबरीकाराने अधोरेखित केला आहे.

७) उपेक्षित समाज आणि त्यांच्या समस्यांचे या कादंबरीतून प्रभावीपणे चित्रण दिसून येते.

८) उच्चवर्णीय वर्गातील सुधारणावादी आणि मानवतावादी दृष्टिकोन असलेल्या व्यक्तिरेखांचे दर्शन या कादंबरीतून होते.

**समारोप** :-

डॉ.शंकरराव खरात यांच्या " पारधी " या कादंबरीतून उपेक्षित जीवनसंघर्ष वाट्याला आलेल्या फासेपारधी समाजाचे जीवनचित्रण प्रतित झाले आहे.माणूस म्हणून जगण्याची इच्छा आणि अस्थिर जीवन या दोन्ही पातळ्यांवर संघर्ष करणाऱ्या फासेपारधी समाजातील तरुणांची ससेहोलपट या कादंबरीतील नायकाच्या व्यक्तिरेखेतून कादंबरीकाराने अधोरेखित करुन फासेपारधी समाजाचे जीवनचित्रण समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.प्रस्थापित समाजाचा फासेपारधी समाजाविषयीचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन एका सतप्रवृत्त तरुणाचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारतो ही बाब प्रचलित सामाजिक आणि शासनव्यवस्थेवर सर्वकष प्रकाश टाकते.कादंबरीकाराने फासेपारधी समाजाचे उपेक्षित जीवन उद्धृत करून हेतूपूर्वक फासेपारधी समाजाची परिवर्तनाची आस प्रतित केली आहे.

**संदर्भग्रंथ / संदर्भसूची :-**

१) डॉ.गावित माहेश्वरी, महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य : एक शोध, दास्ताने रामचंद्र आणि कं,पुणे ,२००८

२) तत्रैव पृष्ठ क्र.१८२

३) डॉ.खरात शंकरराव, ‘पारधी ‘ कादंबरी, मीनल प्रकाशन कोल्हापूर पृ.३७

४) डॉ.गावित माहेश्वरी, महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य :एक शोध, दास्ताने रामचंद्र आणि कं. प्रकाशन, पुणे,पण.पृ.१८२

५) डॉ.खरात शंकरराव, ‘पारधी’ कादंबरी, पृ.४६

६) तत्रैव पृ.३९

७) तत्रैव पृ.४३

८) तत्रैव पृ.६१

९) आणि १०) तत्रैव पृ.१३५

११) तत्रैव पृ.८५

१२) तत्रैव पृ.१८२

१३) डॉ.गावित माहेश्वरी , महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य : एक शोध, पृ.१८२